**१) फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार आळंदी गांव, संवेदनशिल व महत्वाच्या ठिकाणी, आजूबाजूच्या परिसरात ड्रोन व ड्रोन सदृश्य कॅमेराने छायाचित्रण (शुटींग) करण्यास प्रतिबंधात्मक आदेश.**

**संदर्भ :** - आळंदी पोलीस स्टेशन जाक्र/५८९३/२०२२ दि. ०२/११/२०२२ अन्वये.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील आळंदी पोलीस स्टेशन हद्दीतील संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा व कार्तिकीवारी सालाबाद प्रमाणे दि.१७/११/२०२२ ते २३/११/२०२२ रोजी पर्यंत संपन्न होणार आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा व कार्तिकीवारी उत्सव करीता आळंदी शहरात संपुर्ण महाराष्ट्र व परराज्यातुन सुमारे ५ ते ६ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळयाचे कालावधीत आळंदी शहरात लाखो भाविक मंदिर तसेच मंदिर परीसरामध्ये एकच ठिकाणी एकवटलेले असतात. संपूर्ण आळंदी शहर भाविकांनी गजबजलेले असते. काही लोक ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे छायाचित्रण (शुटींग) करण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच जम्मू मध्ये स्फोटके भरलेले दोन ड्रोन जम्मू विमानतळावरील भारतीय विमान स्टेशनवर आदळली, ज्यामुळे इमारतीच्या छताला छोटया प्रमाणात क्षती पोहोचली, दुसरे ड्रोन मोकळया जागी आदळले. अशा प्रकारे काश्मीर मध्ये ड्रोन वापरुन बॉम्ब हल्ला करण्यात आलेला आहे. त्यामुळे अलिकडच्या काळातील वाढते दहशतवादी हल्ल्यांचा,घातपात कारवायांचा विचार करता ड्रोन सारखे इलेक्ट्रीक साधन वापर करुन घातपात होण्याची शकयता नाकारता येत नाही. तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळया करीता येणारे भाविक हे ग्रामीण भागातील असुन त्यांना ड्रोन कॅमेरा ज्ञात नाही. त्यामुळे अचानक ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्यात आले तर भाविकांमध्ये अफवा पसरवुन गडबड गोंधळ उडुन चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन.

पुणे जिल्ह्यातील आळंदीगांव येथील श्री. संत ज्ञानेश्वर मंदिर परिसर व संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक १७/११/२०२२ ते दिनांक २३/११/२०२२ रोजी पर्यंत ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे पुर्व परवानगी शिवाय छायाचित्रण (शुटींग) करण्यास **प्रतिबंध करण्यात येत आहे.** (परवानगी धारक वगळून)

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदरचा आदेश दि -०९/११/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**